शिक्षा अंतिम करणे बाबत
श्री.आवारी शांताराम बबन तात्कालीन पशुधन पर्यवेक्षक
पवैद वांगदरी ता.श्रीगोंदा यांचे गैरवर्तना बाबत

जिल्हा परिषद अहमदनगर
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.कार्या/पंस/आस्था-1/765/2024
अहमदनगर दिनांक 16/07/2024

संदर्भः- 1.गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र जा.क्र.आस्थापना-2/984/20022 दिनांक 13.10.2022

2.या कार्यालयाचा जि.प.आदेश क्र.पसं/आस्था-1/0622/557/20022 दिनांक 1.11.2022

3.इकडील ज्ञापन/दोषोराप पत्र जा.क्र.पंस/आस्था-1/749/2022 दिनांक 14.10.2022

4. गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र जा.क्र.आस्थापना-2/1144/20022 दिनांक 28.11.2022 अन्वये ज्ञापन/दोषोराप पत्राची सादर केलेली पोहच

5. गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र जा.क्र.आस्थापना-1/238/20023 दिनांक 01.03.2023 अन्वये श्री.आवारी यांनी सादर केलेला खुलासा.

6.सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-4/खाचौ/सी.आर.61/2023 दिनांक 19 मे 2023

7.कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.पसं/आस्था-1/496/2024 दिनांक 20.2.2024

8.श्री.आवारी शांतराम बबन यांनी सादर केलेला खुलासा दि.3.3.2024

9.विभागिय चौकशी नियमपुस्तिका 1991 मधील प्रकरण 7.1

10. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 4 ( ५ )

उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये तुम्ही पशुधन पर्यवेक्षक पवैद वांगदरी श्रेणी -2 ता.श्रीगोंदा येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहणे, लम्पी या आजारा बाबतच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेची कार्यवाही न करणे , कार्यालयीन अभिलेखे अपूर्ण ठेवणे,तांत्रिक

उददीष्ट मुदतीत पुर्ण न करणे या प्रकारे गैरशिस्त / गैरवर्तन केल्याने आपणाविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम 1964 नियम 6 नुसार दोषारोप पत्र 1 ते 4 इकडील विभागास सादर केले होते.

संदर्भ क्र.2 अन्वये तुम्ही पशुवैदयकीय दवाखाना वांगदरी ता.श्रीगोंदा येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केल्याने सेवेतुन निलंबीत करणेत आले होते.

संदर्भ क्र.3 अन्वये गैरवर्तना बाबत तुमचे विरुदध 1 ते 5 आरोप ठेवण्यात येवुन सदरचे दोषारोप ज्ञापन 1 ते 4 गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांचे मार्फत बजाविणेकामी पाठविण्यात आले होते.संदर्भ क्र.4 अन्वये दोषारोप मिळाले बाबतची पोहोच प्राप्त झालेली आहे.संदर्भ क्र.5 अन्वये श्री.आवारी यांनी खुलासा सादर केला असुन
त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येऊन न्याय हक्कांचे दृष्टीने विभागिय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम (6) च्या तरतुदीनुसार श्री.आवारी यांचे विरुदध खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करणेत येवुन खातेनिहाय चौकशी करणेत आली.

संदर्भ क्र.6 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाला असुन विभागिय चौकशी अहवालामध्ये ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने,सदरचे गैरवर्तनामुळे तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 तरतुदीनुसार तुम्ही शिक्षेस पात्र ठरत आहात.

संदर्भ क्र.7 चे अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केले नुसार संदर्भ क्र.8 अन्वये श्री.आवारी यांनी खुलासा सादर केला आहे.तसेच विभागिय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती 1991 मधील प्रकरण सात मधील 7.1 नुसार चौकशी अहवालास सहमत असल्याचे,या प्राधिकारणाचे मत आहे.विभागिय चौकशी अहवालातील निष्कर्ष पाहता श्री.आवारी यांनी कामात गैरवर्तन केलेले असल्याने, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 4

CamScanner

( ५ ) च्या तरतुदीमध्ये नमुद केले प्रमाणे ~~----------~~ सक्तीची सेवानिवृत्ती ~~----------~~ ही शिक्षा अंतिम करणेत येत आहे.सदर आदेशाची नोंद सबंधिताच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in यां संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रमांक 202407161100022 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 15-07-2024 17:05:25
( आशिष येरेकर भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रती ,

श्री.शांताराम बबन आवारी तात्कालीन पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती श्रीगोंदा.
व्दारा गट विकास अधिकारी , पंचायत समिती पाथर्डी.

2/- सदर आदेश श्री.शांताराम बबन आवारी तात्कालीन पशुधन पर्यवेक्षक पवैद वांगदरी ता.श्रीगोंदा
यांना बजावणेत येवून दिनांकीत स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- 1. मुख्य लेखा व वित्त अधिकारी ,जिल्हा परिष अहमदनगर
2.गट विकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा / पाथर्डी.
3. निवड नस्ती.

( आशिष येरेकर भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

CamScanner